Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# ‘आमची श्रीवाणी’ विशेषांकातील मिथक आणि मराठी साहित्य

**प्रा. अश्विनी रामचंद्र माळी,** संशोधनकर्ता, पू. सा. गु. वि. प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोणखेडा.
**प्रा. डॉ. विनोद उपरवट,** मार्गदर्शक, वे. खा. भ. से. मंडळाचे कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, धुळे.

**प्रस्तावना**

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे मुखपत्र 'आमची श्रीवाणी' या विशेषांकातील जून 2001 वर्ष 8 अंक 3 यात मिथक आणि मराठी साहित्य या संदर्भात अनेक संपादकांनी आपले लेख प्रकाशित केलेले आहे. मराठी अभ्यास परिषदे मार्फत औरंगाबाद येथे मिथक आणि मराठी साहित्य या विषयावर दोन दिवसाचे चर्चासत्र घेण्यात आले कारण मिथक संबंधीची संकल्पना मुळात अनेकांच्या मनात स्पष्ट नाही. आणि इतर भाषेच्या तुलनेने मराठी या विषयावर तेवढे लिखाण दिसून येत नाही त्यासाठी या विशेषांकात विशेष म्हणजे डॉ.विश्वनाथ खैरे यांनी मिथ्य आणि मराठी साहित्य याविषयी बीजभाषण दिले. व इतर संपादकांनी आपले लेख प्रस्थापित केले डॉ. मु. ब. शहा यांनी मिथक: समीक्षेच्या मानदंड, डॉ. रवींद्र किंबहुने यांनी मिथक: समीक्षेच्या संदर्भात, डॉ. भास्कर गिरधारी यांनी मिथ आणि कर्ण, डॉ. सुधीर कोठावडे यांनी मराठी आणि हिंदी कवितेतील शंबूक-एकलव्य, प्रा. प्रभाकर बागले यांनी मिथक आणि मराठी साहित्य: द्रौपदी तर प्रा. सुषमा दाते यांनी मिथक व साहित्य परस्पर संबंध याविषयी अभ्यासपूर्ण लेख या विशेषांकात आपल्याला मिथक आणि मराठी साहित्य संदर्भात दिसून येतात.

मिथक हा विषय सामाजिक आणि सांस्कृतिक आशयाच्या असल्याने मी त्या संकल्पनेच्या आशय आणि व्यक्ती व्यक्त करताना आपल्यांना साहित्य क्षेत्राच्या मागोवा घ्यावा लागेल . अर्थात 'अर्थासहित शब्द ज्यामध्ये असतात ते साहित्य होय'.जसे की कथा या साहित्य प्रकारात अद्‌भूत आणि सहज विश्वास न बसण्या जोग्या बऱ्याच गोष्टी असल्यामुळे लोकोक्तित ‘मिथ’ या शब्दाला अविश्वसनीय गोष्टी किंवा भूलथापा असाही अर्थ लावला जातो. युरोपियन लोकांना जगभर आदींम जाती भेटल्या व त्यांच्या परंपरागत मुखी कथाना म्हणजे भारतात वेदापासून तर पुराणापर्यंत ज्या कथा आढळल्या त्यांना 'मिथ' ही संज्ञा वापरली. साहित्यात मिथ हा शब्द मिथॉस या ग्रीक शब्दा पासून आला आहे , याचा अर्थ लोकांची कथा कथन, दंतकथा, पौराणिक कथा म्हणजे लोकांना काहीतरी महत्त्वाचे आणि अर्थपूर्ण शिकवण्यासाठी तयार केलेल्या कथा होय.महाकाव्य आणि पुराने हे संस्कृती कथांचे साहित्य आहे. मूळ रूपातल्या त्या कथा रचणारा समाज हा शिकार करणारा, रानावनात फिरणारा किंवा शेती करून आपली उपजीविका भागविणारा होय आणि त्या समाजाच्या लेखन मात्र या सत्यकथा होत्या जसे की, हिवाळयातल्या सकाळी शेकोटी भोवती, उन्हाळयातल्या दुपारी झाडाच्या सावलीत किंवा शरद ऋतूचा रात्री टिपूर चांदण्यात त्यांच्या चर्चासत्राच्या गप्पागोष्टींच्या विषय सत्य आणि कथा असा होता. कारण त्यांच्या मते या कथा आधीच्या काळातल्या घटनांना धरून केलेल्या असल्यामुळे सत्य कथा होत. म्हणजे अवैज्ञानिक असेलच असे नाही. भारतीय चिंतनात मिथ्या म्हणजे सत्याच्या अभास त्याच्याशी 'मिथ' आणि मिथकथा यांचे ही विवरण सुसंगत आहे. 'मिथ'कथांमध्ये अशा आभासी वस्तू आपल्याला भेटत असतात. वस्तू सारखी दिसणारी वस्तू तिच्या आभास असू शकते म्हणजे दिसते तसे नसते या उक्तीप्रमाणे स्पष्ट सांगितले आहे. अशा कथांना श्रद्धेने खरी माणसे हे सुद्धा मेंदूकडून घेत असल्यामुळे श्रद्धा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1**

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

प्रक्रिया आहे. श्रद्धा हा शब्द हृदय वाचक शब्दापासून आला आहे. गीतेवरील शांकरभाष्य स्पष्टपणे "हृदय म्हणजे बुद्धी" असे म्हटले आहे.

कवी मर्ढेकर यांनी असे म्हटले आहे की आहे. बुद्धीशी इमान । जाणें विज्ञानाची ज्ञान: परि कोठे तरी आन। ताण पडे। म्हणजे 'आन आणि ताण' श्रद्धेमुळे पडत असतो. या प्रकारच्या पृथ्वीचा मनस्थितीच्या सामना करायच्या असेल तर श्रद्धेलाही व मेंदूलाही आहे. चिकित्सेचा आवाक्यात घेतले पाहिजे. कोणत्या वस्तूला काय म्हणायचे असे मुलांना मेंदू मार्फत दुसऱ्याने ऐकलेले खरे आहे . तसेच स्वीकारतो म्हणजे श्रद्धेची सुरुवात परंपरागत कथा लहानपणापासून ऐकल्यामुळे त्यांचे रोपण मेंदूत होते. त्याचप्रमाणे रामायण आणि महाभारत या महाकाव्यांमध्ये अनंत आख्याने आहेत .जसे की सावित्री, वटसावित्री ,श्रावणबाळ, राम वनवास, सीता हरण ,द्रौपदी आणि अज्ञात वास तर मराठी स्थलनाम विषयक कथाच्या 'मिथकथा, तथ्यकथा, सत्यकथा अशी तीन परी करून त्यांचे प्राणतत्व किंवा मूलाधार मिथ् तथ्य, सत्य " असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे सीता, कृष्ण, श्रावण, सावित्री, राम इ. 'मिथ्य' आणि त्यांच्या कथा महाकाव्यात व पुराणात सांगितलेल्या आहेत त्यांना 'मिथ्यकथा' असे म्हटले जाते. मिथ्यकथांमध्ये अशा आभासी वस्तू आपल्याला भेटत असतात. त्या अर्थात त्यांचे भान ठेवले तर त्यांच्या मागचे तथ्य शोधले तर आपल्याला सापडते अभ्यासालाच खरे माणिक राहिलो तर कसा अनवस्था प्रसंग उडवतो हे मराठी साहित्यात अनेकदृष्टांतावरून दिसून येते.

मिथक आणि साहित्य यांचे जिवंत संबंध स्पष्ट करताना आणखीन एक सिद्धांत सांगता येतो की, करणाच्या आकलनाचा नव्या चिंतनाचा आणि कलात्मक अविष्काराचा वेध मिथकाच्या आधारावर घेतला जातो. महाभारतातील कर्ण सारख्या व्यक्तींनी पिढ्यानपिढ्या आमच्या अंतकरणाचा ठाव घेतलेला आहे. कर्णाच्या संदर्भात अनेक साहित्यकृती निर्माण झालेल्या दिसतात यावरून कर्ण विषयी मराठी प्रतिभेला केवढे जबरदस्त कुतूहल आहे. याची कल्पना येते. कर्णाच्या जीवनात नियतीच्या प्रभाव दिसतो, त्याच्या कवच कुंडलांच्या दानात भव्योदात्तता दिसून येते, त्याच्या या कृत्यामुळे सहानुभूती आणि कणव निर्माण होते, शिवाय संकटकालीन त्याने दाखविलेले धैर्य ! म्हणून तो आपल्या आदरास पात्र ठरतो, मूल्यांसाठी काही न करणारे व मूल्यांसाठी जीवनाचे रान करणारी माणसं या दोघांच्याही नाश होतो .कर्णाच्या जीवनाच्या शेवट हेच सिद्ध होते. अन्य कोणत्याही पुराण कथेपेक्षा मराठी मनाला महाभारताची ओढ अधिक आहे. महाभारतातील कर्णासारख्या पारदर्शक व्यक्ती त्यांची कुतूहल आणि त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगातील नात्यांचे आकर्षण कधीही न संपणारे आहे. मराठीमध्ये.कर्णाच्या साहित्यकृतींच्या निर्मिती वरून हे लक्षात येते. कृष्णकर्ण आणि कुंतीकर्ण भेट व संवाद हे कर्णाच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग कर्णाला मोठेपणा प्राप्त करून देतात. कर्णकुंती यांच्या भेटीत तुझे पाच पुत्र जिवंत राहतील मात्र अर्जुन किंवा मी असे कर्णकुंतीला अभिवचन देतो, अशा अनेक चांगल्या गुणांनी व कुसंगतीमुळे कर्णाची अद्भुत कहानी रसिक मनाला चटका लावणारी आहे ; म्हणूनच कर्ण ही पुराण व्यक्ती "मिथीकल फिगर" बनली आहे.

महाभारत हे व्यासांनी लिहिलेलं मिथकीय प्रतिभेचा अविष्कार आहे. यामध्ये द्रोपदी हे मिथ सर्वाधिक लक्षणीय आहे. या मिथकातून स्त्री- पुरुष संवाद व संघर्ष प्रवाहित झालेला दिसतो. द्रौपदी ही स्त्री असल्याचे अस्तित्व लादलं. तिला "सर्वजण मिळून वाटून घ्या" याचा अर्थ फक्त तिलाच अनुभवावा लागला. द्यूतात हरवल्यानंतर विटंबना तिला सहन करावी लागली. जटासूर ,जयद्रथ, किचक यांच्या तावडीत सापडल्याच्या यातनामय अनुभव तिच्याच वाट्याला आला आपल्या पाचही मुलांच्या मृत्यू तिने पाहिला, तिच्या देह मनानं अनंत संवेदना गोंदवून घेतल्या .धर्मशास्त्राचे ज्ञान तिलाच आहे .म्हणजे ज्ञान व अनुभव


Copyright © | JET Network, All Rights Reserved

यांनी ती समृद्ध आहे. त्यामुळे ती पाचही पतीना प्रेम देऊ शकते. सवतीपण आणि सावत्रपण विस्तारलं तरी ती मनाच्या तोल जाऊ देत नाही .दुर्योधनाने निर्माण केलेली परिस्थिती त्याच्या परिणाम लक्षात घेऊन धृतराष्ट्र तिला तीन वर देऊ इच्छितो व ती तो नाकारते. लोभ धर्माच्या नाशाला कारण होत असतं असं ती म्हणते; हे तिचे उत्तर आणि तिने मागितलेले दोन वर तिच्या तीक्ष्णबुद्धीची व वर्तमान क्षणाला स्वतंत्रपणे समोर जाण्याची तिच्या क्षमतेची साक्ष देते.

लोकपरंपरेती "सीता" मिथक वडील राजा, जनक, पती राम, दशरथपुत्र राम याची पत्नी तिला जानकी, वैदेही, मैथिली व तिला लक्ष्मीच्या अवतार असेही म्हणतात. तरी सुद्धा तिला आपल्या पतीसोबत वनवासात जावे लागले व पतिव्रता  असून सुद्धा तिची अग्नी परीक्षा घेतली गेली. अशी दंतकथा व त्यामुळे तिची शुद्धता तपासली गेली; अशा अनेक संकटांना व परीक्षणांना सीतामातेला सामोरे जावे लागले. निरपराध सीतेचा त्याग करूनही राम आदर्श राजा म्हणून गौरवला जातो.

**सारांश**

अशाप्रकारे आपल्या मिथक आणि मराठी साहित्य यांच्या प्राचीन काळापासून संबंध सांगता येतो, जीवन जगत असताना अशा मिथकांचा आधारावर जीवन संस्कृतमय व धार्मिकमय होते, आपल्या मनाला भावेल व व समाजाच्या उन्नतीला हातभार लावणारे मिथक, कथा आपण पाहिलेच जसे कर्ण ,द्रोपदी, सीता, पण हे मिथक असून त्यांच्या विषयीची कथा म्हणजेच मिथककथा हे  आपल्यांना प्रत्येक वांग्मयीन साहित्यात दिसून येतात. अशाप्रकारे आपल्यांना मराठी भाषेत  मिथक आणि मराठी साहित्य यांच्या घनिष्टसंबंध सांगता येते .असे  आमची श्रीवाणी  या  विशेषांकातील लेखांचे विश्लेषण करताना किंवा विवेचन करताना दिसून येते.

**संदर्भग्रंथ**

1. साहित्य विचार -भालचंद्र नेमाडे
2. मिथक - देवदत्त पट्टनायक
3. आमची श्रीवाणी विशेषांक - वर्ष - 8 अंक-3 जून 2001.


Copyright © | JET Network, All Rights Reserved